**जिल्हाधिकारी, भंडारा यांचे कार्यालय**
क्र .अका/साखर/पुरवठा निविदा/**2471** /2013
दिनांक :- **09/12/2013**

**प्रति,**

**सहाय्यक संचालक (जाहीरात)**
**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय**
**नविन मंत्रालय,6वा मजला,मुंबई**

**विषय :- जाहिरात वृत्तपत्रात प्रकाशित करण्याबाबत.**

आपणास कळविण्यांत करण्यांत येत आहे कि, सोबत जोडलेली जाहिरात खालील प्रमाणे वृत्तपत्रात प्रकाशित करण्यांत यावी.

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | मुळ कार्यालयाचे नांव व पत्ता | :- | जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा (पुरवठा शाखा) |
| | (दुरध्वनी क्रमांक) | :- | 07184 -252309 Fax- 07184 - 252336 |
| 2. | जाहीरात प्रकाशित करावयाची शेवटची तारीख (अंतिम दिनांक ) | :- | 10 डिसेंबर 2013 |
| 3. | प्रकाशित करण्याचा प्रकार | :- | विभागीय स्तर/ जिल्हा स्तर |
| 4. | संबधित काम असलेला जिल्हा | :- | भंडारा |
| 5. | जाहीराती करीता प्रस्तुत वृत्तपत्रे | :- | मराठी दैनिक- 1, हिंदी दैनिक - 1 |
| 6. | जाहीरात देयके कोणास सादर करावयाचे त्याचे नांव. | :- | जिल्हाधिकारी, भंडारा(पुरवठा शाखा) |
| 7. | जाहीरात प्रत्येक वृत्तपत्रात किती वेळा प्रसिध्दी द्यावयाची आहे. | :- | एक वेळा |

सहपत्र :- जाहिरात मसूद्याच्या प्रती

**(संजय भागवत)**
**जिल्हाधिकारी,भंडारा.**

**जिल्हाधिकारी, भंडारा यांचे कार्यालय**
क्र .अका/साखर/पुरवठा निविदा/**2472**/2013
दिनांक :- **09/12/2013**

## महाराष्ट्र शासन

### (अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग)

### सार्वजनिक वितरण व्यवस्थे अंतर्गत भंडारा जिल्हयांतील पात्र शिधापत्रिकाधारकांना साखर वितरीत करण्यासाठी खुल्या बाजारातून साखर खरेदी करून जिल्हयांतील गोदामांच्या ठिकाणापर्यंत पोहच करण्यासाठी कंत्राट निश्चित करणेबाबत

### ई- निविदा / जाहीर निविदा सुचना

.अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक साखर-2013/प्र.क.131/ना.पु.19 मंत्रालय विस्तार, मुंबई- 400032 दिनांक 02/11/2013 (www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर संगणक संकेतांक 201311021521444206 वर उपलब्ध आहे.) सार्वजनीक वितरण व्यवस्थेअंतर्गत भंडारा जिल्हयातील पात्र शिधापत्रिकाधारकांना साखर वितरीत करण्यासाठी खुल्या बाजारातून साखर खरेदी करून जिल्हयाच्या गोदामापर्यंत पोहच करण्यासाठी कंत्राट निश्चित करण्याचा निर्णय घेण्यांत आलेला आहे. महाराष्ट्र शासनाचे वतीने जिल्हाधिकारी, भंडारा यांचे कडून सार्वजनीक वितरण व्यवस्थेमार्फत वितरीत करावयाची साखर एस-30 दर्जाची व चांगल्या प्रतीची (शुभ्र) 50 किलोच्या पॉली प्रापलीन (P.P.) बॅगमध्ये साखर खरेदीसाठी निविदा मागविण्यांत येत आहे.कंत्राटदाराची नेमणूक करण्यासाठी व्दि लिफाफा पध्दतीने जाहीर खुल्या निविदा सामान्य प्रशासन विभागाचे 1)शासन निर्णय क्र.मातंसं/नस्ती 2010/प्र.क्र.34/39,दिनांक 6 ऑगष्ट, 2010 2)शासन निर्णय क्र.मातंसं/नस्ती 2012/प्र.क्र.273/39,दिनांक19 जानेवारी 2013 मध्ये दिलेल्या सुचनांनुसार **ई- निविदा कार्यप्रणाली** पध्दतीने मागविण्यात येत आहे.त्याचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे राहील.

| अ.क्र. | कार्यवाहीचा टप्पा | पुर्ण करण्याकरीता शेवटचा दिनांक |
|---|---|---|
| 1 | निविदा सुचना जाहीरात प्रसिध्द करणे | 10 डिसेंबर 2013 |
| 2 | निविदा फॉर्म विक्री करणे | 10 डिसेंबर 2013 सकाळी 10.00 पासुन ते 24 डिसेंबर 2013 दुपारी 2.00 वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत ( सुटीचे दिवस वगळून ) |
| 3 | इसारा रक्कम भरणे | 10 डिसेंबर 2013 सकाळी 10.00 पासुन ते 24 डिसेंबर 2013 दुपारी 2.00 वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत ( सुटीचे दिवस वगळून ) |
| 4 | निविदा सादर करावयाचा अंतिम दिनांक | 24 डिसेंबर 2013 दुपारी 2.00 वाजेपर्यंत |

| | | |
|---|---|---|
| | निविदा उघडणे | 26 डिसेंबर 2013 दुपारी 2.00 वाजता |
| 5 | ईच्छूक निविदाकारांचे प्रशिक्षण<br>Pre Bid Conference दिनांक | - |

तसेच निविदा पध्दती ही उदयोग उर्जा व कामगार विभागाच्या क्रं.भाखंस-1094/(2679)/उदयोग दिनांक 02/01/1992 तथा समक्रमांक दिनांक 30/03/1994 तथा त्यामध्ये वेळोवेळी केलेल्या सुधारणानुसार उपरोक्त सामान्य प्रशासन विभागाच्या निर्णयामध्ये दिलेल्या सुचनानुसार व्दि-लिफाफा पध्दतीचा अवलंब करण्यांत येईल व या शासन निर्णयातील सर्व विहित केलेल्या अटी व शर्ती लागू राहतील.

1. सदर निविदेची सविस्तर माहीती अटी व शर्तीसह निविदेचा अर्जाचा नमुना व दराचा तक्ता ईत्यादीसह http://mahatender.gov.in ,**bhandara.nic.in** या संकेतस्थळावर तसेच जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा येथे 10 डिसेंबर 2013 पासुन दिनांक 24 डिसेंबर 2013 पर्यंत कार्यालयीन दिवशी (सुटीचे दिवस वगळून) कार्यालयीन वळेत निविदा संच उपलब्ध राहतील
2. निविदा अर्जाची किंमत रु. 2000/- (अक्षरी रु.दोन हजार फक्त) नापरतावा राहील.सदर रकमेचा **Collector, Bhandara** यांचे नावाने तयार कलेले **राष्ट्रीयकृत/ शेडयुल्ड बँकेचा दर्शनी हुंडी (Demand Draft)** तयार करून कार्यालयांत सादर केल्यानंतर निविदा अर्ज पुरविण्यात येईल.
3. ई- निविदा तसेच निविदेचा लिफाफा दिनांक 24 डिसेंबर 2013 रोजी, दु. 2.00 वाजेपर्यंत जिल्हा पुरवठा कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा येथे स्विकारण्यात येतील. ई-निविदा दिनांक 26/12/2013 रोजी दुपारी 2.00 वाजता जिल्हाधिकारी, भंडारा यांचे सभागृहात मा.जिल्हाधिकारी यांचे समक्ष व उपस्थित निविदाधारक/ निविदाधारकांची प्राधिकृत केलेले प्रतिनिधी यांच्या समक्ष उघडण्यात येतील. वरील मुदतीनंतर आलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही.
4. निविदाकारांस रू. 68.70 लक्ष ची इसारा रक्कम **Collector, Bhandara** यांचे नावाने तयार कलेले **राष्ट्रीयकृत / शेडयुल्ड बँकेचा दर्शनी हुंडी (Demand Draft)** निविदेसोबत विहीत मुदतीत सादर करणे आवश्यक राहील.इसारा रकमेला व्याज देय राहणार नाही.
5. निवीदाधारकाकडे स्वत:च्या मालकीचे किमान 7 ट्रक व नियंत्रणाखालील किमान 7 ट्रक किमान 9 मे.टन वाहनभार क्षमतेचे असणे आवश्यक आहे. सदर वाहनांची यादी निविदेसोबत जोडणे आवश्यक राहील.
6. ई-टेंडरिंगसाठी NIC भंडारा या अभिकर्ता संस्थेची नेमणूक करण्यांत आलेली आहे.

7. निविदा भरणा-या निविदाधारकांना/कंत्राटदारांना डिजीटल सही / प्रमाणपत्र प्राप्त करून घेणे अत्यंत आवश्यक आहे. कारण त्याशिवाय ई-टेंडरींग ऑन लाईन भरता येणार नाही याची सर्व निविदाकारांनी नोंद घ्यावी.

8. निविदा पुर्णतः किंवा अंशतः मंजुर करणे/ नाकारणे किंवा निविदेतील अटी व शर्तीमध्ये अंशतः बदल करण्याचे अधिकार, मा.जिल्हाधिकारी, भंडारा यांना राहतील.

9. कंत्राटदारांना ई-निविदा प्रक्रियेत भाग घेण्याकरिता उपरोक्त संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी विहीत मुदतीत करणे आवश्यक राहील.

**सदस्य सचिव तथा**
**जिल्हा पुरवठा अधिकारी,भंडारा.**

**जिल्हाधिकारी**
**भंडारा**